नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०२/०४/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

## घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील राज नगर चनकापुर येथे दिनांक ३१/०३/२०२२ चे १९.०० वा. दिनांक ०१/०४/२०२२ चे ते ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– दिलीप गणेश पवारीया, वय ३७ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, चनकापुर हे आपल्या घराला कुलुप लावुन डयुटीवर गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी अलमारीत ठेवलेले सोन्याचे दागीने किंमती ४६,०००/–रू. व नगदी १२,०००/–रू. असा एकुण ५८,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जळते मो.क्र. ९६७३८३७००७ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मेन रोड बुटीबोरी येथे दिनांक ३१/०३/२२ चे दिनांक ०१/०४/२०२२ चे रात्री दरम्यान फिर्यादी नामे– विजय विठठलराव मणीयार, वय ४३ वर्ष, रा. रायपुर, ता. हिंगणा जि. नागपुर यांचे किराणा दुंकान असुन किराणा दुकाणाचे अज्ञात आरोपीने लोखंडी शटर तोडुन आत प्रवेश करून दुकानाचे ड्रावर मधुन ७०,०००/–रु. चे रोक रक्कम चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार कुणाल पारधी मो.नं. ७७४१०२२७३१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. वेलतुर** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा बोथली येथे दिनांक ३१/०३/२०२२ चे १०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– दुधराम बशि शेबे, वय ७० वर्ष, रा. बोथली, ता.कुही यांचे शेतामध्ये ट्रॅक्टर मडणी यांच्या साहायाने अंदाजे ६० किलोचे ३३ कट्टे चना काळुन शेतात ठेवलेल्या ठिकानी फिर्यादिने जावुन पाहिले असता त्या ठिकानी प्रत्येकी ६० किलोचे ३३ कट्टे एकुण २० क्किंटल असा ८०,०००/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार कुमरे मो.नं. ९८२३३७०९७० हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**